# सॉंवरे रंग राची

## संत कवयित्री मीराबाई यांच्या जीवनावर आधारित कादंबरी

सोमनाथ केसकर

रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर - ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

# साँवरे रंग राची

सोमनाथ केसकर

© सुरक्षित

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर - ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**लेखक**
सोमनाथ प्रकाश केसकर
ई-३०१, रोहिणी, डीएसके विश्व,
धायरी, पुणे- ४११०४१
मो. नं. ९६५७२२२४४०

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ ३४०/-

युगानुयुगे कृष्णप्रेमाचा ध्यास घेतलेल्या
साऱ्या गोप-गोपिकांस अर्पण...





## *प्रस्तावना*

रम्य ते वृंदावन...पौर्णिमेच्या चंदेरी प्रकाशात न्हाऊन निघालेला यमुनातीर अन त्याचा अथांग कृष्णडोह... काठावरच्या गर्द कदंबवनातून मंद वायुलहरींसह आसमंत भारून टाकणारे ते स्वर्गीय मुरलीचे सूर... त्या सुरात चिंब भिजून बेधुंद रासक्रीडा करणाऱ्या गोपिका... परमात्म्याशी एकरूप होण्यास आतुर झालेल्या प्रकृतीच्या जणू मुक्त पाऊलखुणाच... !! आणि या रासाच्या केंद्राशी सावळ्या रूपात त्यांना खुणावणारा... झुलवणारा... अंतरीचा गाभारा व्यापून टाकणारा तो मुरलीधर कान्हा...

कुणाकुणास वेड लावले नसेल या कान्हाने ?... वृंदावनात रासक्रीडा करत गोपसख्यांना प्रेमयोगाचा दृष्टांत दिला, तर कृष्णवेड्या राधेस त्याने आपल्या रंगात रंगवून टाकले. रुक्मिणी असो वा द्रौपदी... सखा उद्धव असो वा प्रिय अर्जुन...सारेच त्याचे भक्त त्याच्या कृष्णरूपात स्वतःचे अस्तित्व हरवून गेले होते. अथांग प्रेमसागरात जसे एका थेंबाने आत्मसमर्पण करून सागरच होऊन जावे, अगदी तसेच...

जन्मापासून ते आपले अवतारकार्य पूर्ण होईपर्यंत क्षणोक्षणी त्याच्या कृतीतून त्याचा हा प्रेमयोग फुलत राहिला... बहरत राहिला.... अन त्याचा वटवृक्ष झाला.

तो गेल्यावरही युगानुयुगे त्या वृक्षाचा बहर अनेकांना खुणावीत राहिला. त्याच्या साक्षीने गोकुळ वृंदावनात रासलीला होत राहिल्या. चराचरात त्याचे प्रेम झंकारत राहिल्या. अगदी आजही त्याच्या नुसत्या ओझरत्या आठवणीने साऱ्या सृष्टीचा जीव कासावीस होतो. वर्तमानातील त्या गोपिकांची तळमळ होते... मिलनाची ओढ त्यांना आजही आतुर करते.

जसे बीज मिटल्याशिवाय वृक्ष अंकुरत नाही तसेच 'मी' पणातून मुक्त झाल्याशिवाय कृष्णस्वरूप साकारत नाही. त्यामुळेच सारी बंधने झुगारून कान्हाशी एकरूप झालेल्या वृंदावनातील त्या गोपिका जन्ममरणाच्या फेऱ्यांतून मुक्त झाल्या.

आकाशव्यापी झंझावाती मेघाने जसे अखिल धरेला न्हाऊन टाकावे अन् त्या ओलाव्यात चिंब भिजूनही एक काष्ठ मात्र शुष्कच राहावा, तशीच वृंदावनातील एक गोपिका त्या कृष्णस्वरूपास साक्षी असूनही जीवनभर अलिप्त राहिली. सारे गोपगोपी त्या कृष्णरूपी चंद्रप्रकाशास चकोराप्रमाणे प्राशन करीत असताना ही गोपिका तृषार्तच राहिली.

एक दिवस तो योग आला! एक अनामिक क्षणी तिला गोवर्धन गिरिधारीच्या त्या दिव्य स्वरूपाची अनुभूती आली अन् त्याच क्षणी तिची भावसमाधी लागली. या जन्मी त्याची भेट अपूर्ण राहिली, मात्र जन्मोजन्मीचा पुढचा प्रवास केवळ त्या गोविंदासाठीच करण्याचा निश्चय करूनच ती देहमुक्त झाली.

अनेक शतकांनंतर एका थोर राजकुळात तिचा जन्म झाला. स्वर्गीय सौंदर्य, राजवैभव, संपन्नता कशाची उणीव नव्हती. सारी सुखे जणू या राजकुमारीच्या पायाशी लोळण घेत होती. मात्र असे असूनही ती विरक्त होती. बालपणीच्या एका प्रसंगामुळे तिच्या हृदयाने पूर्वजन्मीच्या कृष्णप्रेमाचा ठाव घेतला अन् ती पुन्हा गोविंदाच्या मूर्तीशी एकरूप झाली. कदाचित, अनेक युगांची तिची साधना फलद्रूप झाली असावी.

आता तिचा प्रियकर सखा कृष्ण प्रत्यक्ष तिच्यासमोर नव्हता. त्याचे फक्त साकार मूर्तीरूप तिच्यासमोर होते. मग ती कल्पनेच्या विश्वात आपल्या प्रियकर सख्याशी प्रेमालाप करू लागली. त्याच्या मूर्तिमय सगुण रूपाशीच ती एकरूप झाली.

मात्र पाण्यात राहूनही कमळपुष्प कोरडे, अलिप्त राहतेच ना? तशीच ती या संसाररूपी मोहजाळातून विरक्त राहिली. मोहाचा, लोभाचा त्याग करून जनरीत, लोकलाज, मान-मर्यादा सारे काही सोडून ती कृष्णप्रेमाच्या वेडात तल्लीन झाली. त्याच्या मुरलीतून जसे मंजूळ सूर उमटावेत तसे तिच्या कंठातून स्वर्गीय सूर उमलत राहिले.

ती गोविंदासाठीच गात राहिली, नृत्य करीत राहिली. त्याच्या विरहाने व्याकूळ झाली. त्याच्या भेटीचा धावा करू लागली.

या व्याकूळ प्रेमवेड्या भक्ताच्या भेटीस मग त्याला यावे लागले. त्याच्या कृष्णमेघी अस्तित्वाने तिला व्यापून टाकले. ती मोहरून गेली... तिच्या आयुष्याचा कण कण गोविंदभक्तीने पुलकित झाला.

वसंत ऋतूच्या आगमनाने जसा अखिल सृष्टीस सहजसुंदर बहर येत असतो तशीच सहजता कृष्णप्रेमातून अंकुरलेल्या तिच्या पदांमधून प्रकट होत राहिली. हा प्रेमसुगंध ती मुक्त हस्ते जनमनात वाटत राहिली.

कोण आहे ही गोविंदवेडी गोपिका?

निष्काम 'प्रेम' अन भक्तिरूप 'समर्पण' जिने प्रत्यक्ष आपल्या जीवनाच्या साक्षीने फुलविले.

कोण आहे ही प्रेमरूपी गीतेची स्वरूपा?

ती आहे... मीरा!!

या दोन अक्षरांतच संपूर्ण कृष्णभक्तीचे सार सामावले आहे. हे नाव ऐकताच नेत्रपटलांसमोर उभी राहते ती कृष्णभक्तीमध्ये लीन झालेली एक साकार उत्कट प्रेम-प्रतिमा...

चला! भक्तीच्या अथांग सागरात स्वानुभूतीने अढळपदावर विराजमान झालेल्या या अलौकिक दीपस्तंभाचे दर्शन घेऊ या. कृष्णप्रेमात डुंबलेल्या या गोपिकेसमान आपणही गोविंदाच्या रंगात रंगून जावू या. तिच्या पदांमध्ये ओथंबलेल्या भक्तिरसाची अनुभूती घेऊ या.

संसारचक्रात अडकलेल्या आपणासारख्या सामान्य साधकाला ईश्वराच्या अस्तित्वाचा किमान एखादा कवडसा तरी हाती यावा, या आशेने मीरेच्या या मधुर प्रेमसाधनेचा मागोवा घेणे फलदायी असेल.

याच प्रेरणेने अन गोविंदकृपेने, मीरेचे हे भक्तिरसपूर्ण चरित्र आपल्या हाती सोपवत आहे. हे शास्त्र नव्हे, तर तर्कवितर्कांच्या पलीकडे जाऊन केलेली भावनेची अभिव्यक्ती आहे.

ईश्वर प्रेमाचा अथांग सागर आहे. या प्रेमसागरात मुक्तपणे विहार करणारी नौका मीरेच्या या चरित्रगायनाने आपणास प्राप्त होवो, हीच गोविंदचरणी प्रार्थना.

दिनांक ८ एप्रिल २०१६ (चैत्र शु. प. १ गुढीपाडवा)

**सोमनाथ प्रकाश केसकर**

पत्ता - ई- ३०१, रोहिणी, डीएसके विश्व,

धायरी, पुणे - ४११ ०४१

# *अनुक्रमणिका*


| | | | |
|---|---|---|---|
| १. | मरुभूमी राजपुताना | .......... | ११ |
| २. | जन्मोत्सव | .......... | १९ |
| ३. | रम्य ते बालपण | .......... | ३० |
| ४. | डाकोरनाथ दर्शन अन् मीरेचा हट्ट | .......... | ४७ |
| ५. | हा नटखट कान्हाच तुझा दुल्हा ! | .......... | ७९ |
| ६. | मातेचा विरह | .......... | ९० |
| ७. | समाजाचे विदारक रूप | .......... | ९५ |
| ८. | पूर्वजन्मसंकेत अन् विवाहासाठी मनधरणी | .......... | १०५ |
| ९. | पितामह दुदाजींचे छत्र हरपले | .......... | ११९ |
| १०. | चितौडगडावर विवाहाची बोलणी | .......... | १२३ |
| ११. | विवाह-सोहळा | .......... | १३४ |
| १२. | विवाहाची पहिली रात्र अन् कृष्णमीलन | .......... | १४३ |
| १३. | बिदाई अन् चितौडला प्रस्थान | .......... | १५३ |
| १४. | बहुभोज | .......... | १६७ |
| १५. | पिता अन् पतीवियोग | .......... | १८२ |
| १६. | गुरुकृपा अन् भक्तिपर्व | .......... | १९५ |
| १७. | भक्ताची सत्त्वपरीक्षा | .......... | २०४ |
| १८. | विषाचा प्याला अमृत झाला | .......... | २१९ |
| १९. | दिल्लीच्या सम्राटांची भेट | .......... | २३२ |
| २०. | चितौडत्याग | .......... | २४२ |
| २१. | भक्तीचे वृंदावन अन् गोस्वामींचे गर्वहरण | .......... | २५३ |
| २२. | द्वारकेची यात्रा | .......... | २६८ |
| २३. | गोविंदस्वरूपात विलीन | .......... | २७७ |


✦✦✦